दि.दा क्र. 19/21
आशित वि. भारत व इतर

## निशाणी 4२ वरील आदेश

(1) प्रतिवादी क्र. 4 यांना कैफियत देण्यास झालेला उशीर माफ होणेसाठी अर्ज दाखल आहे.

(2) अर्ज वाचला. त्यावरील वादीच्या म्हणण्याचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. 4 यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी व विधिज्ञ गैरहजर, त्यामुळे अर्ज आदेशासाठी हाती घेण्यात आला.

(3) प्रतिवादी क्र. 4 यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना कैफीयत देण्याकामी जुने कागदपत्रे, फेरफार मिळण्यास उशीर झाल्याने कैफियत सादर करणेस विलंब झाला आहे. प्रतिवादीची कैफियत स्वीकारल्यास वादीचे नुकसान होणार नाही. मात्र, प्रतिवादी यांची कैफियत स्वीकारली नाही तर त्यांचे नुकसान होईल. त्यामुळे, अर्ज मंजूर करणेची विनंती त्यांनी केली आहे.

(कृपया मागे पहा)

Scanned with CamScanner

(4) वादीच्या म्हणण्यानुसार, अर्जातील मजकूर खरा नाही. प्रतिवादीला किती उशीर झाला हे अर्जात नमूद नाही. अर्ज मोघम स्वरूपाचा आहे. उशीराचे कारण योग्य नाही. अर्ज नामंजूर करण्यात यावा.

(5) संचिकेचे अवलोकन केले. दावा हा मोजणी, अतिक्रमण, वाटप, कब्जा व निरंतर मनाई हुकुम या मागण्यांसाठी दाखल आहे. दाव्यामध्ये सर्व प्रतिवादी अद्याप हजर नाहीत. प्रकरण त्यांच्या हजेरीसाठी प्रलंबीत आहे. प्रकरणाचा निकाल गुणादोषांवर देण्यासाठी सर्व पक्षांना संधी देणे गरजेचे आहे. अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यास वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. त्यामुळे, अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

(1) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

दि 16.11.2021
नेवासा.

श्रीमती बी. के. पाटील
२रे सहदिवाणी न्यायाधीश (क स्तर) नेवासा

Scanned with CamScanner